MHNB030020472022

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 1182/2022**
**शासन वि. धर्मराज शिंदे**
**निशाणी क्र. 8**

## न्यायनिर्णय

**(जाहीर दिनांक :– 10 जानेवारी, 2023)**

आरोपी धर्मराज माणिक शिंदे याच्या विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, 1949 चे कलम 65(ई) अन्वये दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

02. अभियोग पक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. पाटील व आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. जी. एन. बैरागी यांचा युक्तीवाद ऐकला.

03. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ समोर आले. त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदविली आहे.

| *अ.क्र.* | *मुद्दे* | *निष्कर्ष* |
|---|---|---|
| (1) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि. 15.09.2022 रोजी दुपारी 01.00 वाजता राकसवाडे गावातील काटेरी झाडांमध्ये, ता. जि. नंदुरबार येथे आरोपी हा विनापरवाना | नाही. |

बेकायदेशीररित्या त्याच्या ताब्यात 2 काळ्या रंगाच्या मातीच्या माठामध्ये प्रत्येकी 40 लिटर अशी एकुण 80 लिटर गावठी हातभट्टीची दारु बाळगताना मिळुन आला ?

(2) आदेश काय ? — आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते.

{ कारण मिमांसा }

04. अभियोग पक्षातर्फे एकुण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. धारेश्वर विक्रम राजपुत (सा.क्र.1) हे पंच साक्षीदार आहेत. संदीप मगन कोळी (सा.क्र.2) हे पंच साक्षीदार आहेत. वारंवार संधी देवुनही अभियोग पक्ष फिर्यादी तथा इतर साक्षीदारांना साक्षकामी हजर न ठेवु शकल्याने निशाणी क्र. 1 वरील आदेशाप्रमाणे अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

05. आरोपीस गुन्ह्यात गोवणारा पुरावा अभिलेखावर न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 313(1)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

**मुद्या क्रमांक 1 करीता :-**

06. धारेश्वर राजपुत (सा.क्र.1) व संदीप कोळी (सा.क्र.2) हे पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केले नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारांना उलटतपासादरम्यान विचारण्यात येणारे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता साक्षीदारांनी जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे मान्य केले, परंतु

पंचनाम्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले व तसेच त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन दारु जप्त केल्याची बाब स्पष्टपणे नाकारली.

07. अभियोग पक्षास पुरेशी संधी देवुनही प्रस्तुत खटल्यामध्ये फिर्यादी तथा इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली नाही. तसेच पंच साक्षीदारांनी अभियोग पक्षास सहकार्य न केल्याने प्रस्तुत खटल्यातील दारु आरोपीच्याच ताब्यातुन जप्त झाली ही बाब नि:संशयपणे सिध्द होत नाही.

08. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, 1949 चे कलम 103 अनुसार असे गृहीतक आहे की, आरोपीने कोणतेही मादक द्रव्य, भांग, मोहाची फुले अथवा काकवी जवळ बाळगल्याबाबत समाधानकारकरित्या उत्तर दिले नाही तर या अधिनियमाखाली अपराध केला असे गृहीत धरण्यात येईल. परंतु, प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीच्या ताब्यात मादक द्रव्य असल्याचे अभियोग पक्षाने सिध्द न केल्याने कलम 103 अन्वयेचे गृहीतक व त्याचे आरोपीकडुन खंडण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

09. सर्वात महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुत खटल्यामध्ये रासायनिक विश्लेषणाचा अहवाल दाखल केलेला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन प्रतिबंधीत दारु जप्त करण्यात आली ही बाब अभियोग पक्ष संशयापलीकडे जावुन सिध्द करण्यात अपयशी ठरले. सबब, मी मुद्या क्रमांक 1 चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**<u>मुद्या क्रमांक 2 करीता</u> :-**

10. अभियोग पक्ष आरोपी हा विनापरवाना त्याच्या ताब्यात प्रतिबंधीत मादक द्रव्य बाळगताना मिळुन आला ही बाब संशयापलीकडे जावुन सिध्द करण्यात अपयशी ठरले. सबब, आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्येमाल गावठी हातभट्टीची दारु ही जागीच नाश करण्यात आल्याने त्याबाबत आदेश पारीत करण्याची आवश्यकता नाही. सबब, मुद्या क्र. 2 च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आ दे श</u>**

(1) आरोपी धर्मराज माणिक शिंदे याची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 255(1) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, 1949 चे कलम 65(ई) मधुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

(2) आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येते.

(3) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम 437-अ अन्व्ये रु. 15,000/- चे जामीनपत्र व बंधपत्र सादर करावे. सदर जामीनपत्र व बंधपत्र सहा महिन्यांपर्यंत अंमलात राहिल.

Digitally signed by AKSHAY RAMESHRAO KULKARNI
Date: 2023.01.10 16:25:50 +0530

दिनांक :- 10 जानेवारी, 2023.

(अक्षय र. कुलकर्णी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र. 3, नंदुरबार.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer / Clerk | : | J. V. Bagad, Junior Clerk. |
| Court | : | J.M.F.C. 3rd Court, Nandurbar. |
| Judgment Date | : | 10.01.2023. |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 10.01.2023. |
| Judgment uploaded on | : | 10.01.2023. |